दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET
Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816
■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३२२ ■ शनिवार, दि. २२ मार्च २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -322 ■ Saturday, 22 March 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## वक्फने अवैधपणे बळकावलेल्या जमिनी काढून घेऊ - बावनकुळे

मुंबई : राज्यात अनेक ठिकाणी वक्फ बोर्डाने जमिनी बळकावल्याच्या तक्रारी आहेत. याबाबत केंद्रीय स्तरावर कायदा करण्याचे काम सुरु आहे. मात्र, खासगी आणि देवस्थानच्या जमीनी वक्फ बोर्डाने बळकावल्या असल्याचे आढळून आले तर त्या काढून घेतल्या जातील, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली.

देवस्थान जमिनी वर्ग १ करणे, शासकीय जमिनींवरील अतिक्रमण आणि वनहक्क जमीनी याबाबत आमदार गोपीचंद पडळकर, आमदार मोनिका राजळे आणि आमदार देवराव भोंगळे यांनी विधानसभेत दाखल केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले की, राज्य सरकारने या मुद्द्यावर गांभीर्याने विचार केला असून, महसूल विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या शिफारशींनंतर सरकार विधिमंडळात कायदा आणणार आहे. मराठवाड्यात काही प्रमाणात शेतकऱ्यांना जमीन परत मिळण्याच्या निर्णयावर मंत्रिमंडळाने चर्चा केली असली, तरी प्रत्यक्ष कायदा मंजूर करावा लागेल असेही बावनकुळे यांनी सांगितले.

दरम्यान, शेतकऱ्यांच्या जमिनींबरोबरच देवस्थानच्या इनाम जमिनींवरील अतिक्रमणाचाही मुद्दा अधिवेशनात चर्चेत आला. आमदार मोनिका राजळे यांनी महाराष्ट्रातील विविध भागांतील देवस्थानांच्या जागांवर होत असलेल्या अतिक्रमणावर आवाज उठवला. नागपूर, राहुरी, श्रीरामपूर, कोल्हार यांसह अनेक ठिकाणी मंदिरांच्या जागांवर अनधिकृतरित्या बांधकामे झाल्याचे दाखवून दिले. महसूलमंत्री बावनकुळे यांनी अतिक्रमण हटवण्यासाठी स्थानिक प्रशासन आणि पोलीस यंत्रणेला निर्देश देऊन अतिक्रमण रोखण्यासाठी लवकरच कडक कायदा आणला जाणार असल्याचे स्पष्ट केले.

# तिन्ही दलांची हल्ला क्षमता वाढवण्यासाठी ५४ हजार कोटी रुपयांच्या संरक्षण करारांना मंजुरी

**नवी दिल्ली : सरकारने तिन्ही दलांची हल्ला क्षमता वाढवण्यासाठी ५४ हजार कोटी रुपयांच्या संरक्षण करारांना मंजुरी दिली. ज्यामध्ये लष्कराच्या रणगाड्यांसाठी अधिक शक्तिशाली इंजिन, नौदलासाठी पाणबुडीविरोधी टॉर्पेडो आणि हवाई दलासाठी पाळत ठेवणारी प्रणाली एडब्ल्यूएसीएस खरेदीचा समावेश आहे.**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली आज, गुरुवारी झालेल्या संरक्षण अधिग्रहण परिषदेच्या बैठकीत या संदर्भातील प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली.

परिषदेने बैठकीत ५४ हजार कोटी रुपयांपेक्षा



जास्त रकमेच्या ८ भांडवली अधिग्रहण प्रस्तावांना आवश्यकता स्वीकृती दिली.

या करारांमध्ये लष्करासाठी असलेल्या टी-९० टँकच्या विद्यमान १००० एचपी इंजिनांना अपग्रेड करण्यासाठी १३५९ एचपी इंजिनांच्या खरेदीला मंजुरी समाविष्ट आहे. यामुळे या रणगाड्यांची युद्धभूमीतील गतिशीलता वाढेल, विशेषतः उंचावरील भागात, कारण त्यामुळे शक्ती-ते-वजन गुणोत्तर वाढेल. भारतीय नौदलासाठी, वरुणास्त्र टॉर्पेडो (लढाऊ) खरेदीलाही मान्यता देण्यात आली आहे. वरुणास्त्र टॉर्पेडो हा नौदल विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रयोगशाळेने विकसित केलेला स्वदेशी विकसित केलेला जहाजावरून सोडला जाणारा पाणबुडीविरोधी टॉर्पेडो आहे.

नौदलात या टॉर्पेडोचा मोठ्या प्रमाणात समावेश झाल्यामुळे, शत्रूच्या पाणबुड्या नष्ट करण्याची त्यांची क्षमता वाढेल.

गरजेनुसार, भारतीय हवाई दलासाठी एअरबोर्न अर्ली वॉर्निंग अँड कंट्रोल (एडब्ल्यूएसीएस) प्रणाली खरेदी करण्यासही परिषदेने मान्यता दिली. एडब्ल्यूएसीएस प्रणाली हवाई दलाच्या क्षमता वाढवेल आणि युद्धाच्या संपूर्ण क्षेत्राला बदलण्यास सक्षम आहे.

संरक्षण मंत्रालयाने २०२५ हे वर्ष 'सुधारणांचे वर्ष' म्हणून पाळले असल्याने, परिषदेने भांडवल अधिग्रहण प्रक्रियेच्या विविध टप्प्यांवर वेळेची मर्यादा कमी करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांना मान्यता दिली जेणेकरून ती जलद, अधिक प्रभावी आणि कार्यक्षम होईल.

# एकनाथ शिंदे यांनी दिली महत्त्वाची माहिती; लाडक्या बहिणींना २१०० रुपये

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीण योजनेबाबत दिली महत्त्वाची माहिती दिली आहे. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळालं आहे. २३७ जागांचं प्रचंड बहुमत महायुतीला मिळालं. या यशात मतदारांचा वाटा तर होताच. पण सर्वात महत्त्वाचा वाटा ठरला तो लाडक्या बहिणींचा. कारण लोकसभा निवडणूक निकालात फटका बसल्यानंतर लाडकी बहीण योजना आणली. या योजनेत पात्र महिलांना प्रति महिना १५०० रुपये दिले गेले आहेत. दरम्यान या योजनेत २१०० रुपये कधी दिले जाणार याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी माहिती दिली आहे.



**माझी लाडकी बहीण योजना काय आहे?**

ज्या कुटुंबांचं वार्षिक उत्पन्न हे अडीच लाख रुपयांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांना आर्थिक मदत व्हावी या उद्देशानं राज्य सरकारनं मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. २०२४ च्या जुलै महिन्यापासून या योजनेला सुरुवात झाली. या योजनेंतर्गत दर महिन्याला लाभार्थी महिलांच्या बँक खात्यामध्ये १५०० रुपये जमा करण्यात येतात. आतापर्यंत एकूण नऊ हप्ते लाभार्थी महिलांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आले आहेत. मार्च महिन्याचा हाप्ता देखील लाभार्थी महिलांना मिळाला आहे. मध्य प्रदेशातील मेरी लाडली बहना या योजनेच्या धर्तीवर माझी लाडकी बहीण योजना आणण्यात आली. या योजनेचा फायदा महायुतीला विधानसभा निवडणुकीत झाला हे स्पष्टच दिसून आलं.

लाभार्थी महिलांना २१०० रुपये देण्याचं सरकारचं आश्वासन

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या दरम्यान राज्यात आमचं सरकार आलं तर आम्ही लाडकी बहीण या योजनेच्या अंतर्गत मिळणाऱ्या १५०० रुपयांमध्ये वाढ करुन तो निधी २१०० रुपये करण्यात येईल असं आश्वासन देण्यात आलं होतं. लाभार्थी महिलांना २१०० रुपये देऊ अशी घोषणा महायुतीच्या नेत्यांकडून करण्यात आली होती. विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं. राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार आलं, आता २१०० रुपये कधी मिळणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. अर्थसंकल्पामध्ये यासंदर्भात घोषणा होऊ शकते असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र अर्थसंकल्पात काहीही तरतूद करण्यात आली नव्हती. दरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीण योजनेबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे.

राज्यातील सगळ्या योजना सुरू आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आम्ही सुरू केली, ती अद्यापही सुरू आहे, पण काहीजण म्हणत होते ही योजना फसवी आहे, खरं नाही. पण, या योजनेसह, लेक लाडकी योजना, शासन आपल्या दारी व इतरही योजना सुरू आहेत. शिवभोजन थाळी, आनंदाचा शिधा ह्या योजनाही बंद नाहीत, त्या चालूच आहेत.

ज्या पात्र बहिणी आहेत, त्यापैकी एकही लाडकी बहीण वंचित राहणार नाही, असा शब्दच एकनाथ शिंदेंनी लाडक्या बहिणींना दिला. मात्र, निकषात बसणाऱ्या लाडक्या बहिणींनाच याचा लाभ मिळेल, जर चारचाकी गाडी असेल किंवा निकषात नसेल अशांनाच या योजनेचा लाभ मिळणार नाही, असंही एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. तसंच २१०० रुपये आम्ही लवकरच लाडक्या बहिणींना देऊ असंही आश्वासन एकनाथ शिंदे यांनी दिलं आहे.

## प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून २० लाख घरे उभारणार - जयकुमार गोरे

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून राज्यात २० लाख घरे उभारण्याचे उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. इतर कोणत्याही राज्यापेक्षा जास्त आणि आतापर्यंतच्या उद्दीष्टापेक्षा दुप्पट उद्दीष्ट महाराष्ट्राला प्राप्त झाली असल्याची माहिती ग्रामविकास आणि पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानपरिषदेमध्ये दिली. म.वि.प. नियम २६० अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावाला उत्तर देताना मंत्री गोरे बोलत होते. शंभर दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत राज्यात १८ लाख ५१ हजार घरांना एकाच दिवशी एकाच वेळी मंजुरी देण्याचे काम विभागाने केले आहे. १४ लाख ७१ हजार लाभार्थ्यांना घरकुलाचे काम सुरू होण्यापूर्वी प्रथम हप्त्याचे वितरण करण्यात आले आहे. राज्यात घरकुलाच्या कोणत्याही लाभार्थ्याला निधी कमी पडू दिला जाणार नाही. घरकूल योजनेच्या लाभामध्ये ५० हजार रुपयांनी वाढ करुन ती आता २ लाख १० हजार करण्यात आली आहे. भूमिहीन लाभार्थ्यांना जमीन खरेदीसाठी मदत करण्यात येत आहे. जमीन खरेदीच्या लाभामध्येही ५० हजार रुपयांची वाढ करून ती १ लाख रुपये करण्यात आली आहे. त्याचबरोबर राज्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजना आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून हजारो किलोमीटरचे रस्ते तयार करण्यात आले आहेत. केंद्राचा ५०० लोकवस्तीचा निकष २५० लोकवस्तीपर्यंत करण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# आग्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य स्मारक उभारणीची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवजयंती दिनी केली होती. या स्मारकाच्या उभारणीसाठी कार्यान्वयीन व निधीची जबाबदारी राज्याच्या पर्यटन विभागाकडे देण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयामुळे भव्य स्मारकाच्या उभारणीस गती लाभणार आहे.

स्मारक उभारणीसाठी पर्यटन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली इतिहास तज्ज्ञ तसेच जाणकार, तज्ज्ञांची समिती स्वतंत्रपणे स्थापन करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी निधी उपलब्धता, जमीन अधिग्रहण व अनुषंगिक बाबींकरिता पर्यटन विभागाला जबाबदारी देण्यात आली आहे. या विभागातंर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम पाहणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आणि बाळराजे शंभुराजे यांची आग्र्यातून सुटका आणि महाराजांच्या पराक्रमाच्या गौरवगाथेचे स्मरण पुढील पिढ्यांसाठी करून देण्यासाठी हे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. आग्रा येथील ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेत होते, ती जागा-वास्तू महाराष्ट्र शासन या प्रकल्पात अधिग्रहीत करणार आहे. याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक निर्माण करण्यात येणार आहे. या शौर्य स्मारकामध्ये महाराजांचा जाज्वल्य इतिहास मांडला जाणार आहे. त्यासाठी अत्याधुनिक सुविधांनी युक्त असे उपक्रम संग्रहालय, दृकश्राव्य कार्यक्रम, माहितीपट आदी राबविण्यात येणार आहेत. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले छत्रपती शिवाजी महाराज आणि बाळराजे शंभुराजे यांना मावळ्यांसह मुघलांनी कपटाने नजरकैदेत ठेवले होते. परंतु आपल्या चातुर्याने आणि पराक्रमाने महाराजांनी नजरकैदेतून स्वतःसह शंभुराजे आणि सर्व मावळ्यांची सुटका करून घेतली. या ऐतिहासिक आणि महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असलेल्या घटनेबाबत मराठीच नव्हे तर इतिहासप्रेमी पर्यटकांत औत्सुक्य असते. आग्रा येथे ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेत राहीले त्या ठिकाणी आवर्जून जाण्याचा प्रयत्न पर्यटक करतात, मात्र या ठिकाणी कोणतीही ऐतिहासिक बाब, स्मारक, संग्रहालय नसल्याने या पर्यटकांपर्यंत हा जाज्वल्य इतिहास पोहचत नाही. महाराष्ट्राच्या बाहेर अशाप्रकारचा अत्यंत दुर्मिळ असा केलेला पराक्रम ही इतिहासातील अत्यंत महनीय आणि अभ्यासपूर्ण बाब आहे. अशा स्थळासाठी आणि त्या देदिप्यमान इतिहासाचे उदात्तीकरण आणि तो वारसा पुढच्या पिढ्यांकडे कायम रहावा, त्या स्थळांची, त्या वारशांची जतन, सवंर्धन आणि विकास करण्याकरिता शासनाने इतर राज्यातील अशी स्थळे सुध्दा विकसित करण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे.

# औरंगजेबाची कबर तोडायला तुमची मुलं पाठवा, गरीबांची, अमित शाह यांच्यासमोरील संजय राऊत यांचं भाषण चर्चेत

राज्यात गेल्या काही दिवसांपासून पेटलेला औरंगजेबच्या कबरीचा मुद्दा आता राज्यसभेत पोहचला असून, शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी हात मुद्दा आज राज्यसभेत उपस्थित केला. यावेळी ते म्हणाले, मणिपूरनंतर महाराष्ट्र जळत आहे, नागपूरमध्येही दंगली होत आहेत. गृह मंत्रालयाने गेल्या काही वर्षांत देशाला पोलीस स्टेट (सरकारी नियंत्रण) बनवले आहे. याचबरोबर संजय राऊत यांनी केंद्र सरकारला औरंगजेबची कबर तोडण्याचे आव्हान दिले व औरंगजेबाची कबर तोडण्यासाठी तुमच्या परदेशात शिकत असलेल्या मुलांना पाठवा असेही म्हटले. दरम्यान संजय राऊत यांच्या या भाषणावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाहदेखील सभागृहात उपस्थित होते.

गृह मंत्रालयाच्या कामकाजावरील चर्चेत सहभागी होत, राऊत यांनी सरकारवर टीका केली. त्यांनी आरोप केला की देशाला अस्थिर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्ती वारंवार औरंगजेबाचे नाव घेत आहेत, ज्यामध्ये महाराष्ट्र सरकारमधील मंत्री आणि केंद्र सरकारमधील वरिष्ठ पदांवर असलेल्या लोकांचा समावेश आहे.

कबर तोडायला तुमची मुलं पाठवाः

जर तुम्हाला औरंगजेबाची कबर तोडायची असेल तर खुशाल तोडा, तुम्हाला कोण रोखत आहे. केंद्रात आणि राज्यात तुमचे सरकार आहे. मुख्यमंत्री तुमचे आहेत, गृहमंत्री तुमचे आहेत तिथे जावा आणि तोडा. पण कबर तोडण्यासाठी तुमच्या मुलांना पाठवा आमच्या नाही. तुमची मुलं परदेशात शिक्षण घेत आहेत, परदेशात नोकरी करत आहेत आणि गरीब मुलांची माथी भडकावून ही कामे करायला लावत आहात.

**महाराष्ट्र सरकारमधील मंत्री आणि**

गेल्या ३०० वर्षात नागपूरमध्ये एकही दंगली झालेली नाही, असे सांगून राऊत म्हणाले, औरंगजेबाचे नाव पुन्हा पुन्हा घेऊन देशाला अस्थिर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्तींपैकी काही महाराष्ट्र सरकारमधील मंत्री आणि केंद्र सरकारमधील वरिष्ठ पदांवरील लोक आहेत. जर आपण त्यांना रोखले नाही तर हा देश एकसंध आणि एकात्मिक राहणार नाही.

यावेळी संजय राऊत असेही म्हणाले की, देशाची एकता आणि अखंडता राखणे हे गृह मंत्रालयाचे काम आहे, परंतु गेल्या काही वर्षांत देशाचे रूपांतर पोलीस स्टेटमध्ये (सरकार नियंत्रित) झाले आहे. गृह मंत्रालय राजकीय विरोधकांना कमकुवत करत आहे आणि राजकीय पक्ष फोडत आहे.

नागपूरमध्ये हिंसाचार

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मागणीसाठी विश्व हिंदू परिषदेने केलेल्या आंदोलनामध्ये धार्मिक साहित्य जाळल्याच्या अफवांवरून सोमवारी संध्याकाळी नागपूरच्या अनेक भागात मोठ्या प्रमाणात दगडफेक आणि जाळपोळ करण्यात आली. नागपुरात झालेल्या हिंसाचारात पोलिस उपायुक्त दर्जाच्या तीन अधिकाऱ्यांसह तेहतीस पोलिस कर्मचारी जखमी झाले आहेत.

# वेध हवामान विज्ञानाचा

जागतिक हवामान विज्ञान दिन दरवर्षी २३ मार्च रोजी साजरा केला जातो. हा दिवस वर्ल्ड मेटिओरोलॉजिकल ऑर्गनायझेशन (डब्ल्यूएमओ)च्या स्थापनेच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. हा दिवस हवामानशास्त्र, हवामान बदल, आणि त्याचा मानवी जीवनावर होणारा परिणाम यासंबंधी जागरूकता निर्माण करण्यासाठी महत्त्वाचा आहे. डब्ल्यूएमओची स्थापना २३ मार्च १९५० रोजी झाली. १९५१ मध्ये ही संस्था संयुक्त राष्ट्रसंघाचे अधिकृत अंग बनली. हवामान, जलविज्ञान आणि पर्यावरणाच्या क्षेत्रातील संशोधन आणि माहिती देवाणघेवाण यासाठी ही संस्था जागतिक स्तरावर महत्त्वाची भूमिका बजावते. १९६१ पासून हा दिवस दरवर्षी वेगवेगळ्या विषयांवर आधारित साजरा केला जातो. 'क्लोजिंग द अर्ली वॉर्निंग गॅप टुगेदर' अशी यावर्षीच्या हवामानदिनाची थीम ठरवण्यात आली आहे. हवामान विज्ञान म्हणजे पृथ्वीवरील वातावरणाचा अभ्यास. यात हवामानातील बदल, तापमान, वाऱ्याची गती, दाब, आर्द्रता, पर्जन्यमान आणि विविध नैसर्गिक प्रक्रिया समाविष्ट असतात. कृषी, उड्डाण, नौकायान, संरक्षण क्षेत्रात हवामानविषयक माहितीचा वापर अत्यंत महत्त्वाचा ठरतो. हवामान अंदाज वर्तवण्यासाठी उपग्रह, रडार, ऑब्झर्व्हेटरी आणि संगणकीय मॉडेल्सचा वापर केला जातो. भारतामध्ये हवामान निरीक्षण आणि अभ्यासाचा इतिहास प्राचीन काळापासून आहे. ऋग्वेद, पुराणे आणि खगोलशास्त्रीय ग्रंथांमध्ये हवामानाच्या विविध घटकांचा उल्लेख आहे. महाभारत आणि कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही हवामानशास्त्राचा उल्लेख आढळतो. प्राचीन कृषी व्यवस्थेत पर्जन्यमान आणि ऋतूंचा अभ्यास केला जात असे. भारतीय पंचांगांमध्ये सूर्य, चंद्र आणि नक्षत्रांच्या हालचालींवर आधारित हवामान अंदाज केले जात असत आणि आजही ते वर्तवले जातात.

आधुनिक हवामान विज्ञानाची सुरुवात ब्रिटिश कालखंडात झाली. ब्रिटिश सरकारने ६ ऑक्टोबर १८७५ रोजी कोलकाता येथे भारतीय हवामान विभागाची स्थापना केली. हेन्री फ्रँसिस ब्लॅनफोर्ड हे या विभागाचे पहिले महासंचालक होते. त्यावेळची हवामानाची स्थिती आणि आजची स्थिती यामध्ये महद्अंतर आहे. त्यामुळे हवामान विभागाची स्थापना झाली त्यावेळी चक्रीवादळे आणि दुष्काळ यांचा अंदाज काढणे ही प्रामुख्याने या विभागाची कर्तव्ये होती. पुढे १८८० नंतर मुंबई, चेन्नई, पुणे येथे हवामान निरीक्षण केंद्रे स्थापन केली गेली. १८९० मध्ये मान्सून अभ्यास सुरू झाला. १९२८ मध्ये हवामान अंदाजासाठी पुणे वेधशाळेची स्थापना झाली. यादरम्यान गिल्बर्ट वॉकर यांनी 'वॉकर सर्क्युलेशन' आणि 'एल निनो' यांचा अभ्यास केला. १० एप्रिल १९८२ रोजी स्वतंत्र भारताने आपला पहिला हवामान उपग्रह – इन्सॅट–१ ए (इंडियन नॅशनल सॅटेलाईट सिस्टीम) हा अवकाशात प्रक्षेपित केला आणि उपग्रहाद्वारे हवामान निरीक्षणाची सुरुवात झाली. या उपग्रहाचा उद्देश दूरसंचार, हवामानशास्त्र आणि आपत्ती व्यवस्थापन यासाठी मदत करणे हा होता. पण काही तांत्रिक कारणांमुळे हा उपग्रह यशस्वी होऊ शकला नाही. यानंतर भारताने १९८३ मध्ये इन्सॅट १ बी आणि त्यानंतर सी, डी उपग्रह प्रक्षेपित केले, जे अधिक यशस्वी ठरले. २०१३ आणि २०१५ मध्ये इन्सॅट थ्रीडी आणि इन्सॅट थ्रीडीआर प्रक्षेपित करण्यात आले. गेल्या काही दशकांत भारताने हवामानशास्त्रात लक्षणीय प्रगती केली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हवामान अंदाज अधिक अचूक आणि प्रभावी करण्यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. चक्रीवादळे, पर्जन्यमान, गारपीट आणि उष्णतेच्या लाटा यांचे पूर्वानुमान सुधारण्यासाठी संशोधन, उपग्रह, रडार आणि संगणकीय मॉडेलिंगचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. भारताचा हवामान विज्ञानाचा प्रवास १८७५ पासून २०२४ पर्यंत मोठ्या सुधारणा आणि संशोधनाने परिपूर्ण आहे. जागतिक हवामान विज्ञान दिन हा हवामानशास्त्राच्या महत्त्वाची जाणीव करून देतो. हवामान बदल रोखण्यासाठी वैज्ञानिक संशोधन, तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करणे आवश्यक आहे. हवामानाशी संबंधित अचूक माहिती आणि वेळेवर दिले जाणारे इशारे मानवी जीवन आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यास मदत करतात. भारतात हवामान अंदाज सुधारण्यासाठी आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी डॉप्लर वेदर रडार मोठ्या प्रमाणावर वापरली जात आहे. ही प्रणाली प्रामुख्याने चक्रीवादळे, ढगफुटी, मुसळधार पाऊस, गारपीट आणि वादळांचा अचूक अंदाज व निरीक्षण करण्यासाठी वापरली जाते. डॉप्लर रडार हा अत्याधुनिक हवामान निरीक्षण तंत्रज्ञानाचा भाग आहे. तो रेडिओ तरंगांचा उपयोग करून हवामानातील बदल आणि पर्जन्यवृष्टीचे स्वरूप, वेग आणि दिशा याचा वेध घेतो. वाऱ्याचा वेग, दिशा, ढगांमध्ये पाण्याचा अंश आणि बर्फाचे प्रमाण यांचे आकलन याद्वारे केले जाते. सध्या भारतामध्ये ३९ हून अधिक डॉप्लर रडार कार्यरत आहेत. येणाऱ्या काळात 'मिशन मौसम' अंतर्गत २०२६ पर्यंत ८७ नवीन डॉप्लर वेदर रडार बसवण्याची योजना आहे.

# मानव जीवनात पाणी हेच अमृत

## (२२ मार्च: जागतिक पेय जल दिवस विशेष.)

**स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त संत निरंकारी मिशन मार्फत देशभर राबवण्यात येत असलेल्या अमृत परियोजने अंतर्गत रविवार दि.२६ फेब्रुवारी २०२४ रोजी देशभरात सुमारे ११०० पेक्षा अधिक ठिकाणी 'स्वच्छ जल स्वच्छ मन' अभियान राबवण्यात आले. या अभियानांतर्गत नदी परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या स्वच्छता मोहीमेत नदीपात्र, पाणवठे व पाणी स्वच्छ करण्यात आले. या मोहीमेत हजारो निरंकारी संत व सेवादलाचे बंधुभगिनी सहभागी झाले होते. स्वच्छ जल आणि जल रक्षणाप्रति समर्पित अशी ही मोहीम आहे. ती दरवर्षी राबविण्यात येत आहे. या लोककल्याणकारी मोहिमेचे व कार्याचे जगभरातून कौतुक होत असते. अशा मोहिमेत सामान्य जनतेनेही सहभाग घेऊन आपला खारीचा वाटा उचलायला काय हरकत आहे? श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर प्रेरणादायी संकलित लेख... संपादक**

उन्हाळा सुरु झाला कि सर्वत्र पाण्याच्या तुटवड्याचे संकेत निर्माण होतात, जगामध्ये आजही पाण्याचे संकट सुरू आहे. असा एकही प्रदेश नसेल जेथे पाण्याची कमतरता भासत नाही. आजही लोकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळताना वणवण फिरावे लागते. असं तुम्ही कित्येकदा ऐकले असेल, भविष्यामध्ये पाण्यासाठी महायुद्धही होऊ शकते. एवढे सजीवांना पाण्याची आवश्यकता आहे. परंतु, दिवसेंदिवस मानव पाण्याचे महत्त्व विसरत चालला आहे, ज्यामुळे आज पाणी टंचाईच्या संकटाला जग सामोरे जात आहे. प्रत्येकाच्या जीवनातील पाण्याचे महत्त्व सम जावून सांगण्यासाठीच जागतिक पेय जल दिन साजरा करायला सुरूवात झाली म्हणायला हरकत नाही. संयुक्त राष्टाचे सदस्य असलेल्या देशांकडून दरवर्षी हा दिवस आवर्जून साजरा केला जातो. तसेच दरवर्षी एक नवी संकल्पनाही या दिवसासाठी मांडली जाते. वर्षभर या संकल्पनेस अनुसरून विविध उपक्रम राबवले जातात. यावर्षीची जागतिक जल दिनाची थीम वेल्यूइंग वाटर ही आहे. दि.२२ मार्च १९९२ रोजी प्रथम जागतिक जल दिन साजरा केला गेला. संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण आणि विकासाच्या परिषदेत हा दिवस साजरा करण्याचा निर्णय ब्राझील मधील रिओ दि जानेरो येथे घेण्यात आला. संयुक्त राष्ट्रसंघाने सन १९९३ साली महासभेत हा दिवस वार्षिक कार्यक्रम म्हणून साजरा करण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केला.

पृथ्वीवर ७० टक्क्यांहून अधिक प्रमाण पाण्याचे आहे. पण सरासरी पाहता गोड्या पाण्याचे– पेय जलाचे प्रमाण क्षारयुक्त पाण्यापेक्षा खूपच कमी आहे. क्षारयुक्त पाण्याची टक्केवारी ही ९७.३ इतकी आहे, परंतु हे पाणी पिण्यास योग्य नाही. मुंबईसारख्या मेट्रो शहरांमध्ये दररोज गाड्या धुण्यासाठी लागणाऱ्या पाण्यावर साधारण ५० लाख लिटर




पाणी खर्च होते. त्याचप्रमाणे मुंबई, दिल्ली, आणि चेन्नईसारख्या शहरांमध्ये पाईपलाईन दुरुस्ती करताना अथवा खराब झाल्यामुळे ४० टक्क्यांपर्यंत पाण्याचा अपव्यय होतो. काही ठिकाणी पाणी टंचाईमुळे पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना वणवण फिरावे लागते. घरी सकाळी ब्रश करताना नळा चालू ठेवला असता पाच मिनिटांमध्ये अनेक लिटर पाणी सहज वाया जाते. शरीर निरोगी राहण्यासाठी प्रत्येक व्यक्तीस दररोज पिण्यासाठी ३ लिटर पाण्याची आणि तसेच जनावरांसाठी साधारण ५० लिटर पाण्याची आवश्यकता भासते. एक किलो गहू पिकवण्यासाठी एक हजार लिटर तर एक किलो तांदूळ उगवण्यासाठी चार हजार लिटर पाण्याची आवश्यकता भासते. अशाप्रकारे विविध गोष्टींद्वारे आपल्याला जीवनामध्ये पाण्याचे अत्यंत महत्त्व आहे. पाण्यासंदर्भात अशा अनेक गोष्टी आहेत, ज्याची कल्पना कदाचित आपल्याला नसेलही. परंतु, योग्य वेळी पाण्याचं महत्त्व न जाणल्यास भविष्यात येणाऱ्या पाण्याच्या समस्येसाठी तयार राहणे गरजेचं आहे. त्यामुळे आत्तापासूनच पाण्याची समस्या भविष्यात उद्भवणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त संत निरंकारी मिशन मार्फत देशभर राबवण्यात येत असलेल्या अमृत परियोजने अंतर्गत रविवार दि.२६ फेब्रुवारी २०२४ रोजी देशभरात सुमारे ११००पेक्षा अधिक ठिकाणी 'स्वच्छ जल स्वच्छ मन' अभियान राबवण्यात आले. या अभियानांतर्गत नदी परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या स्वच्छता मोहीमेत नदीपात्र, पाणवठे व पाणी स्वच्छ करण्यात आले. या मोहीमेत हजारो निरंकारी संत व सेवादलाचे बंधुभगिनी सहभागी झाले होते.



– संकलन व शब्दांकन –
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा–
७७७५०४१०८६.

स्वच्छ जल आणि जल रक्षणाप्रति समर्पित अशी ही मोहीम आहे. ती दरवर्षी राबविण्यात येत आहे. या लोककल्याणकारी मोहिमेचे व कार्याचे जगभरातून कौतुक होत असते. अशा मोहिमेत सामान्य जनतेनेही सहभाग घेऊन आपला खारीचा वाटा उचलायला काय हरकत आहे? पाण्याची आवश्यकता भासत नाही असे कोणतेच क्षेत्र पृथ्वीतलावर आढळणे अशक्य आहे. परंतु, काही दशकांपासून पाण्याचा होणारा अयोग्य अविचारी आणि अतिरिक्त वापर हा भविष्यात भासणाऱ्या पाण्याच्या समस्येचे संकेत देत असल्याचे जाणवते. निसर्गातील गोड्या म्हणजेच पिण्यायोग्य पाण्याचे स्त्रोत प्रमाण अगदीच तुटपुंजे असल्याने त्याचा अत्यंत विचारपूर्वक जपून वापर करणे, त्याच्या स्रोतांचे योग्यरित्या संवर्धन करणे गरजेचे आहे. भविष्यामध्ये पुरेसे पाणी मिळण्यासाठी तिसरे महायुध्द होण्याचीही शक्यता मानली जात आहे, इतके पाण्याचे महत्त्व सर्वांच्या जीवनामध्ये आहे. तहान लागल्यावर विहीर खणायला गेल्याने कोणतेच प्रश्न सुटत नाही. त्यासाठी सर्व गोष्टींचे पूर्वनियोजन करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे सद्यस्थिती पाहता पाण्याचा योग्य प्रमाणत आणि आवश्यक तितकाच वापर करणे फायदेशीर ठरेल. त्यासाठी नेसर्गिकरित्या उपलब्ध असेलल्या पाण्याच्या स्रोताची योग्य निगा राखणे, तो कोणत्याही कारणास्तव दूषित न होणे याची काळजी घेणे आवश्यक आहे. पिण्याचे पाणी सर्वांनाच गरजेप्रमाणे उपलब्ध होणे गरजेचे आहे. स्वत:ला रोज खरोखर किती पाण्याची गरज आहे हे सम जून घेऊन आवश्यकतेनुसारच पाणी प्रत्येकाने वापरले पाहिजे. तरच भविष्य उज्वल राहील.

**!! विश्व पेय जल दिनाच्या सर्वांना सजगतेसंबंधी हार्दिक शुभेच्छा !!**

# प्रदूषणामुळे १३१ शहरांचा कोंडला श्वास

**भारतातील सर्वाधिक प्रदूषण करणारे सुमारे ८० टक्के कारखाने उत्तर प्रदेश आणि हरियाणामध्ये आहेत. पर्यावरण वाचवण्यासाठी कडक नियम आखले जात असताना आर्थिक चणचण आणि सरकारी दबावामुळे अनेक कारखाने अडचणीत आले असले तरी १३१ शहरांमधील हवेत श्वास घेणे म्हणजे साक्षात विष प्राशन करण्यासारखे असल्याचे म्हटले जात आहे. २३ मार्चच्या हवामान दिनाच्या पार्श्वभूमीवर घेतलेला या गंभीर प्रश्नांचा मागोवा.**



भारतातील औद्योगिक विकास देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. नवे कारखाने, नवे रस्ते, नवी शहरे वसवली जात आहेत; पण सोबतच प्रदूषणाची समस्या बनली आहे. नुकत्याच समोर आलेल्या एका अहवालात दिसून आले आहे की, भारतातील सर्वाधिक प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांपैकी सुमारे ८० टक्के कारखाने दोन राज्यांमध्ये आहेत. या राज्यांमधील अनेक कारखाने जुन्या पद्धतीने चालत असून त्यामुळे अधिक प्रदूषण होत आहे. अनेक वेळा प्रदूषण कमी करण्यासाठी घालून दिलेले नियम कारखाने पाळत नाहीत. त्यामुळे सम स्या आणखी वाढतात.

या राज्यांमधील लोकसंख्याही झपाट्याने वाढत आहे. त्यातून निघणारा धूर, घाण पाणी आणि कचरा आपल्या आजूबाजूचे वातावरण प्रदूषित करत आहे. त्यामुळे श्वास घेण्यात अडचण, डिहायड्रेशन, आजार यांसारख्या समस्या वाढत आहेत. देशात असे ३५१९ कारखाने आणि संयंत्रे आहेत, जे सर्वाधिक प्रदूषण करणारे उद्योग मानले जातात. हे उद्योग कठीण टप्प्यातून जात आहेत. त्यांना शासनाचे नियम पाळावे लागतात. पर्यावरण वाचवण्याच्या उपायांकडे लक्ष द्यावे लागते आणि त्याचबरोबर त्यांना आपले आर्थिक अस्तित्व टिकवून ठेवायचे असते. या उद्योगांसमोर तीन मोठी आव्हाने आहेत. प्रदूषण कमी करण्यासाठी सरकारने कायदे कडक केले आहेत. उद्योगांमधून निघणारा धूर, रसायने आणि घाण पाणी यामुळे पर्यावरणाची हानी होत आहे.

नवीन सरकारी नियमांचे पालन करण्यासाठी उद्योगांना अधिक खर्च करावा लागतो. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नावर परिणाम होतो. देशाच्या 'जीपीआय'मध्ये एकट्या उत्तर प्रदेशचा वाटा ४७ टक्के आहे. त्यामुळे हे राज्य भारतातील औद्योगिक प्रदूषणाचे सर्वात मोठे केंद्र बनले आहे.

हरियाणा दुसऱ्या क्रमांकावर आहे. येथे एकूण ११४० जीपीआयपैकी १७४ कारखान्यांनीने स्वतःहून काम करणे थांबवले आहे; पण चांगली गोष्ट म्हणजे उर्वरित ९६६ कारखान्यांपैकी ९५७ कारखाने पर्यावरणविषयक नियमांचे पालन करत आहेत.

म्हणजेच हरियाणातील बहुतांश कारखाने आता प्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत; मात्र छत्तीसगड आणि गुजरातमधील बहुतांश कारखाने अजूनही नियमांचे पालन करत नाहीत. छत्तीसगडमध्ये २९ पैकी ८ कारखाने पर्यावरणाला हानी पोहोचवत आहेत.

संपूर्ण भारताबद्दल बोलायचे झाल्यास ८१ टक्के (२८४९) 'जीपीआय' अजूनही चालू आहेत, तर १९ टक्के कारखाने ६७० स्वतः बंद झाले आहेत. आकडेवारी दर्शवते की ९७ टक्के 'जीपीआय' पर्यावरणीय नियमांचे पालन करत आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानुसार, 'जीपीआय' कारखाने नदी किंवा नाल्यांमध्ये सांडपाणी सोडतात, घातक रसायने वापरतात किंवा ऑक्सिजनचे पाणी लक्षणीयरीत्या कमी करतात. पर्यावरण वाचवण्याची जबाबदारी केवळ केंद्र सरकारची नाही, तर राज्य सरकारांचीही त्यात महत्त्वाची भूमिका आहे.

आजच्या घडीला केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय देशभरातील औद्योगिक युनिट्सवर लक्ष ठेवते. प्रदूषण करणाऱ्या उद्योगांना यापुढे सोडले जाणार नाही, असा इशारा सरकारने दिला आहे. सर्व ग्रॉस पोल्युटिंग इंडस्ट्रीजचे 'ऑनलाईन कंटिन्युअस एफ्लुएंट मॉनिटरिंग सिस्टीम'द्वारे रिअल–टाइममध्ये निरीक्षण केले जात आहे. याचाच अर्थ या कारखान्यांकडून नदी–नाल्यांमध्ये घाण पाणी सोडले जात असल्याचे दिसून येत आहे.

नियमांचे पालन न करणाऱ्या २१ कारखान्यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली असून ७३ कारखाने बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यापैकी ५५ उत्तर प्रदेशमध्ये तर पाच हरियाणामध्ये आहेत. २०२२ ते २०२४ पर्यंत 'सीपीसीबी'ने २६८ औद्योगिक युनिट्सची तपासणी केली आहे.

'सीपीसीबी'ने अशा १७ युनिट्सची ओळख पटवली आहे, जिथे प्रदूषण पसरण्याची सर्वाधिक शक्यता आहे. त्यात रासायनिक उद्योग, साखर कारखाने, कापड उद्योग, कागद उद्योग आणि चर्मोद्योगांचा समावेश आहे. डिसेंबर २०२४ मध्ये लोकसभेत विचारण्यात आलेल्या प्रश्नावर उत्तर देताना सरकारने म्हटले होते की, तपासणी दरम्यान एकूण १२९ युनिट्स आढळून आले, जे पर्यावरण नियमांचे पालन करत नाहीत. या युनिट्सवर विविध प्रकारे कारवाई करण्यात आली. त्यातील पाच युनिट बंद करण्याचे आदेश देण्यात आले. ६७ जणांना 'कारणे दाखवा' नोटीस किंवा तांत्रिक सूचना देण्यात आल्या. 'एसपीसीबी'ला ४१ प्रकरणांमध्ये निर्देश देण्यात आले होते.

सर्वाधिक प्रदूषण करणाऱ्या उद्योगांमध्ये ब्रुअरीज साखर कारखाना खतनिर्मिती संयंत्रे, कागद बनवण्याचे कारखाने क्लोर–क्षार उद्योग, औषधनिर्मिती कारखाने, पेंट उत्पादन, कीटकनाशके तयार करणारे कारखाने, तेल शुद्धीकरण, चामडे उद्योग, पेट्रोकेमिकल उद्योग, सिमेंट उद्योग, थर्मल पॉवर प्लांट, लोह आणि पोलाद उद्योग, जस्त वितळवणारा कारखाना, तांबे वितळवणारे कारखाने, ॲल्युमिनियम स्मेल्टिंग प्लांट्स यांचा समावेश असून त्यांना प्रदूषण मर्यादा ठरवून दिल्याचे सरकारचे म्हणणे आहे.

८० हून अधिक उद्योगांसाठी पर्यावरणीय मानके तयार करण्यात आली आहेत. 'एसपीसीबी' कारखाना चालवू शकतो की, नाही हे ठरवते आणि कारखाने नियमांचे पालन करत आहेत की नाही हेदेखील तपासतात. एखाद्या कारखान्याने नियम मोडल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाते. प्रदूषण स्तरावर लक्ष ठेवण्यासाठी, सर्व 'जीपीआय'ला 'ऑनलाइन मॉनिटरिंग सिस्टीम' स्थापित करणे आवश्यक आहे. देशातील १३१ शहरे अशी आहेत, जेथील हवेत श्वास घेणे म्हणजे साक्षात विष प्राशन करण्यासारखे असल्याचे म्हटले जात आहे.

धक्कादायक म्हणजे देशातील सर्वाधिक प्रदूषित शहरांमध्ये महाराष्ट्राचा क्रमांक पहिला आला आहे. दुसऱ्या क्रमांकावर उत्तर प्रदेश आहे. त्यानंतर तिसऱ्या क्रमाकांवर आंध्र प्रदेश आहे. सरकारने यापैकी सर्वाधिक १९ शहरांची आकडेवारी जाहीर केली आहे.

लोकसभेमध्ये एका सदस्याने विचारलेल्या एका प्रश्नावर केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी या संदर्भात माहिती दिली आहे. देशातील २४ राज्यांमधील १३१ शहरांतील प्रदूषणाची पातळी खूपच वाढली आहे. त्यापैकी १९ शहरे अधिक धोकादायक पातळीच्या प्रदूषणाचा सामना करत आहेत. या शहरांना 'नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम'मध्ये निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे. या शहरातील 'एक्यूआय' पातळीचे सातत्याने निरीक्षण केले जात आहे. सरकारने २०२५–२६ पर्यंत या शहरातील प्रदूषण ४० टक्क्यांपर्यंत घटवण्याचे टार्गेट ठेवले आहे. हे टार्गेट 'नॅशनल एंबियंट एअर क्वालिटी स्टॅंडर्ड्स'नुसार निश्चित केले आहे.

प्रदूषित शहरांपैकी बहुतांश शहरांची लोकसंख्या ८० लाखांहून अधिक आहे. महाराष्ट्रात १९ सर्वांत जास्त प्रदूषित शहरे आहेत, उत्तर प्रदेशमध्ये १७, आंध्र प्रदेशमध्ये १३, पंजाबमध्ये ९, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश आणि ओडीशातील प्रत्येकी सात शहरे सर्वाधिक प्रदूषित आहेत.

अकोला, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, बदलापूर, चंद्रपूर, जळगाव, जालना, कोल्हापूर, लातूर, मुंबई, नागपूर, नाशिक, नवी मुंबई, पुणे, सांगली, सोलापूर, ठाणे, वसई, विरार आणि उल्हासनगर ही महाराष्ट्रातील सर्वाधिक प्रदूषित शहरे बनली आहेत.

उत्तर प्रदेशमधील आगरा, प्रयागराज, अनपारा, बरेली, फिरोजाबाद, गजरौला, गाजियाबाद, गोरखपूर, झांसी, कानपूर, खुर्जा, लखनऊ, मोरादाबाद, वाराणसी आणि मेरठ ही शहरे प्रदूषित आहेत. आंध्र प्रदेशमधील अनंतपूर, चित्तूर, एलुरू, गुंटूर, कडापा, कुरनूल, नेल्लोर, ओन्गोले, राजामुंद्री, श्रीकाकुलम, विजयवाडा, विशाखापट्टणम आणि विजयानगर, पंजाबमधील अमृतसर, डेरा बाबा नानक, डेरा बस्सी, गोबिंदगढ, लुधियाना, नयानांगल आणि पटियाला ही शहरे प्रदूषित आहेत. या शहरांमधील प्रदूषण कमी करण्याचे आव्हान सरकारसमोर आहे.

– मिलिंद बेंडाळे, वन्य प्राणी आणि पर्यावरण अभ्यासक

# ग्रंथोत्सव परिसंवादः भाषेचा विकास ही निरंतर प्रक्रिया- डॉ.मिलिंद दुसाने



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भाषेची निर्मिती ही उत्पादन प्रक्रियेशी संबंधित आहे. जोपर्यंत उत्पादन आणि त्याद्वारे जीवन जगण्याचा प्रवाह सुरु आहे तोवर भाषानिर्मिती होत राहणार. भाषेचा विकास ही निरंतर प्रक्रिया असून या भाषांवर आधारीत ज्ञानव्यवहाराची महत्त्वाची केंद्रे म्हणून ग्रंथालयांना विशेष महत्त्व आहे,असे प्रतिपादन जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी आज ग्रंथोत्सवातील परिसंवादात केले.

ग्रंथोत्सवाच्या दुपारच्या सत्रात 'मराठी भाषेच्या विकासात ग्रंथालयाचे योगदान' याविषयावर परिसंवाद आयोजीत करण्यात आला. अध्यक्षस्थानी जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने हे होते. तर डॉ. रा.श बालेकर, अनिल लहाने, गुलाबराव मगर, कुंडलिक कतकरे यांनी सहभाग घेतला. परिसंवादात डॉ.बालेकर यांनी ग्रंथालयांची आवश्यकता व त्याद्वारे लोकांना मिळणारी सेवा याबाबत माहिती दिली. तर अनिल लहाने यांनी वाचन संस्कृतीत ग्रंथालयांचे महत्त्व व त्याद्वारे भाषाविकासाची प्रक्रिया विषद केली. कुंडलिक कतकरे यांनी साहित्य निर्मिती व त्या साहित्याचा प्रसार करण्यात ग्रंथालयांची भुमिका मांडली. गुलाबराव मगर यांनी ग्रंथालयांचा विकास, त्यांच्या व्यवस्थापनातील अडचणी यावर प्रकाश टाकला.

डॉ. दुसाने म्हणाले की, ज्यावेळी सम ाजातील काही घटकांना लिहिणे वाचण्यास प्रतिबंध करणारी कुप्रथा होती. त्यावेळेसही ह्या घटकांनी आपल्या जीवन जगण्याच्या प्रक्रियेत भाषा विकसित करीतच होते. अनेक घटकांच्या दैनंदिन व्यवहारातील वेगवेगळे शब्द आपणास माहिती नसतात. कारण त्यांचे जीवन आपणास माहिती नाही. ह्याच वर्गातील लोक शिकले, लिहू लागले त्यांनीही साहित्य निर्मिती केली आणि नंतर त्यांचे शब्द मराठी भाषेत आले आणि मग आपली भाषासमृद्ध झाली. ही प्रक्रिया निरंतर सुरुच असते. ही भाषा विविध साहित्याच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचविणारे ग्रंथालये व त्यातील ग्रंथपाल हे या प्रक्रियेतील महत्त्वाचे दुवा होत,असेही डॉ. दुसाने यांनी सांगितले. सूत्रसंचालन प्रविणा कन्नडकर यांनी केले.

आज(दि.२२)भरगच्च कार्यक्रम व समारोप

ग्रंथोत्सवात शनिवार दि.२२ रोजी सकाळी ११ वा. 'भारतीय संविधान - हक्क आणि कर्तव्य' या विषयावरील परिसंवाद कार्यक्रमात अध्यक्षस्थानी डॉ.जयदेव डोळे असणार आहे. डॉ. ऋषिकेश कांबळे, डॉ.ह.नि. सोनकांबळे, ॲड बाबा सरदार उपस्थित राहणार आहे. दुपारी २ वा. कथाकथन कार्यक्रमात अध्यक्षस्थानी उत्तम बावस्कर सहभाग गेनू शिंदे, सरदार जाधव, श्रीमती ज्योती सोनवणे असणार आहे. दुपारी ४ वा. समारोप समारंभास प्रमुख उपस्थिती ज्येष्ठ संपादक प्रविण बर्दापुरकर, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, सहायक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, हास्य कवी डॉ. विष्णू सुरासे, जिल्हा ग्रंथालय अध्यक्ष सुभाष सोळंके उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमास ग्रंथप्रेमी, वाचकांनी, विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर ग्रंथोत्सव - २०२४ समन्वय समितीचे अध्यक्ष सहायक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, सदस्य शिक्षणधिकारी (माध्य) श्रीमती अश्विनी लाटकर, जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने, कार्यवाह मराठवाडा साहित्य परिषद डॉ.दादा गोरे, प्रकाशक संघटना कुंडलिक अतकरे, जिल्हा ग्रंथालय संघ अध्यक्ष सुभाष सोळंके, सदस्य सचिव जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष धो. साबळे, संयोजन सदस्य ज्ञानेश्वर पैठणे, दीपक काळे, संजीव ठाकूर, श्रीमती उज्वला नाटकर आदींनी केले आहे.

**ग्रंथोत्सवास उत्साहात प्रारंभ**

# पालकांनी स्वतः वाचावे मग मुलांवर वाचनाचे संस्कार करावे- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुले वाचत नाहीत अशी तक्रार हल्ली पालक करतात. मुलांवर वाचनाचे संस्कार करायचे तर पालकांनी आधी पुस्तकं वाचायला हवीत, तरच मुले त्यांचे अनुकरण करतील, आणि पुढच्या पिढीत वाचन संस्कृती रुजेल,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाच्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्यावतीने शुक्रवार दि.२१ व शनिवार दि.२२ असे दोन दिवस ग्रंथोत्सव २०२४ चे आयोजन येथील समता दर्शन वाचनालय सभागृह चुन्नीलाल पेट्रोल पंप समोर समता नगर येथे करण्यात आले आहे. ग्रंथोत्सवाचे उद्घाटन आज जिल्हाधिकारी स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. दासू वैद्य हे होते. तर ज्येष्ठ साहित्यिक प्रकाशक बाबा भांड, डॉ. रा. शं. बालेकर, गुलाबराव मगर, अण्णा वैद्य, प्रशांत गौतम, पत्रकार सुहास सरदेशमुख,




जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनिल हुसे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे आदी उपस्थित होते.

ग्रंथदिंडीने सुरुवात

ग्रंथोत्सवाचा प्रारंभ क्रांती चौकातून ग्रंथदिंडीद्वारे करण्यात आला. मानव विकास आयुक्तालय उपायुक्त मिलिंद नारिंगे, ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड, साहित्यिक डी.एस.काटे, कुंडलिक अतकरे आदी मान्यवर तसेच शालेय विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी यावेळी विविध वेषभूषा करुन आपला सहभाग दिला.

ग्रंथदालनाचे उद्घाटन

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते ग्रंथोत्सवातील ग्रंथदालनांचे उद्घाटन करण्यात आले. या ठिकाणी ग्रंथदालने असून तेथे ग्रंथ प्रदर्शन व विक्रीची सोय आहे. ग्रंथप्रेमींनी ग्रंथ पाहण्या व खरेदी करण्यासाठी गर्दी केली होती.

दीपप्रज्वलनाने मुख्य सोहळ्यास सुरुवात झाली. यावेळी जिल्हाधिकारी स्वामी यांनी वाचन संस्कृतीचे महत्त्व विषद केले. ते म्हणाले की, आपण संतांची भुमि म्हणतो मात्र प्रत्यक्षात संतांचे साहित्य वाचत नाही. बौद्धिक प्रगल्भतेसाठी वाचन करणे गरजेचे आहे. कविता, गीत, कथा, कादंबऱ्या, वैचारीक ग्रंथ, क्रमिक पुस्तके असे कोणत्याही स्वरुपातील साहित्य हे संस्कारासाठी महत्त्वाचे असते. अनेक घरांमध्ये शोकेस मध्ये पुस्तके ठेवलेली असतात. पुस्तके हे शोभेची वस्तू नसून ते वाचण्यासाठी व आत्मसात करण्यासाठी आहे. वाचन संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी लहान लहान स्वरुपात ग्रंथोत्सव आयोजीत करुन मुलांपर्यंत पुस्तके पोहोचवावीत. त्यांची व ग्रंथांची भेट घडवावी,असे आवाहन जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले. प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी साबळे यांनी केले तर सुत्रसंचालन प्रविणा कन्नडकर यांनी केले.

# छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात अनधिकृ'त भूखंड, बांधकामाचे होणार सर्वेक्षण

## - महानगर आयुक्त तथा विभागीय आयुक्त दिलीप गावडे

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रात अनाधिकृत भूखंड तसेच बांधकामाबाबत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मदतीने सर्वे क्षण करण्यात येणार आहे. महानगर क्षेत्रात सर्वे क्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त दिलीप गावडे यांनी केले आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयात आज छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील विना परवानगी भूखंड तसेच बांधकाम सर्वेक्षणाबाबत श्री. गावडे यांनी आज शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील सर्वेक्षणासाठी सेवा देणारे विद्यार्थी तसेच अधिकाऱ्यांशी संवाद साधला, यावेळी महानगर नियोजनकार हर्षल बावीस्कर, सह महानगर नियोजनकार रविंद्र जायभाये यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. महानगर आयुक्त श्री.गावडे म्हणाले, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रात अनाधिकृत ,विना परवाना भूखंड व बांधकामाबाबत सर्वेक्षण करण्यात येणार आहे. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी सर्वेक्षणासाठी आपली सेवा देणार आहेत. 'कमवा व शिका' योजनेच्या धर्तीवर शैक्षणिक अभ्यासक्रमावर कोणत्याही प्रकारचा परिणाम न होऊ देता विद्यार्थी सर्वे क्षणाचे काम करणार आहेत. या सर्वेक्षणा अंतर्गत महानगर क्षेत्रात नागरिकांकडे विद्यार्थी जातील त्यावेळी नागरिकांनी आपल्याकडील या संदर्भातील कागदपत्रे विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याबरोबरच सर्वेक्षणातील प्रश्नावली बाबत अचूक माहिती द्यावी. जेणेकरून नियमाप्रमाणे भूखंड तसेच बांधकाम नियमित करण्याकामी मदत होणार आहे.

अनधिकृत भूखंड तसेच बांधकाम नियमित झाले तर गरजूंना या मालमत्तेवर बँकेकडून कर्ज मिळणेही सुलभ होणार आहे. तसेच ज्यांना सदर मालमत्तेची विक्री करावयाची असल्यास विक्री करणेही सुलभ होईल. त्यामुळे नागरिकांनी या सर्वे क्षण मोहिमेसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना सहकार्य करावे, असे आवाहनही विभागीय आयुक्त तथा महानगर आयुक्त श्री गावडे यांनी केले.

सर्वेक्षणाअंतर्गत विद्यमान वापर, भूखंड धारकांचे नाव, भूखंड क्रमांक, गट क्रमांक, मालकी हक्काबाबतची कागदपत्रे, बांधकाम परवानगी, सातबारा उतारा, भूमी अभिलेख कार्यालयाकडील मोजणी, ग्रामपंचायत ८ अ उतारा, वीज देयक ,लेआऊट प्रत, भूखंडाचे क्षेत्रफळ, बांधकामाचे क्षेत्रफळ, भूखंड तसेच बांधकामाचा कच्चा नकाशा, मिळकतीचे वर्णन याबाबतची माहिती संकलित केली जाणार आहे.

# जितो लेडीस विंग तर्फे सांस्कृतिक कार्यक्रमास उत्स्फुर्त प्रतिसाद



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जितो लेडीज विंग तर्फे नेहमी सामाजिक व जनकल्याणकारी उपकम राबविले जातात. याच अंतर्गत महिला दिवसाचे व होळीचे औचित्य साधुन देवडा फार्म हाउफ्स येथे कलर चे होळीचे संस्कुतिक मनोरंजन. व विविध कार्यकम सुध्दा घेण्यात आले होते. यामध्ये होळी, विविध प्रकारचे खेळ, अंताक्षरी, सेल्फी कॉर्नर,हाउफ्जी, नृत्य संगीत, आदी कार्यकमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिलांनी एकमेकाची ओळख दिली आणि आपला आपला व्यवसाय बद्दल विचार मांडले.

महिला दिवस निमित्त विविध खेळ आयोजित करन्यात आले राशी देऊन पुरस्कृत करन्यात आले. यामध्ये ११० महिलांची उपस्थिती होती. यावेळी पुरस्कार देण्यात आला. यावेळी जितो महाराष्ट्र अध्यक्षा डिंपल पगारीया, अनुपमा दगडा वीना गादीया देवडा फाम चे सचालक यांचे सुध्दा या कार्यासाठी सहकार्य मिळाले.

कार्यकमाचे सयोजक भारती पगारीया हया होत्या. कार्यकम यशस्वी करण्यासाठी अध्यक्षा प्रिया मुथा, उपाध्यक्ष रीतू जैन, प्रिती बाकलीवाल, सचिव सोनल जैन, सहसचिव सपना मुथियान, सारिका सेठी, कोषाध्यक्ष डॉ. प्रियंका संघवी यांनी परिश्रम घेतले. कार्यकम ासाठी संपुर्ण जितो लेडीज विंगच्या सदस्या उपस्थित होत्या.



# अफ़ीफा वसीम खान आयुष्यातला पहिला रोजा

जिंतूर :पवित्र रमजानचे महिन्यात अफ़ीफा वसीम खान, यांचे आयुष्यात पहिला रोजा, हा मुलीचे वय फक्त ०८ वर्ष आहे, हे आज़म कॉलनी जिंतूर येथे राहते, हे टीपू सुलतान ब्रिगेडचे अध्यक्ष, मोहसीन खान यांची भाची आहे. यावेळी अफ़ीफा वसीम खान यांना सर्व कुटुंबांना शुभेच्छा दिली

# देवगिरीत सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धतीवर राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न.

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित देवगिरी महाविद्यालय (स्वायत्त) मध्ये दिनांक १९ मार्च २०२५ रोजी समाजशास्त्र विभाग व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ पुरस्कृत एकदिवशीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय कार्यशाळा ङ्गसामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धतीङ्ग या विषयावर संपन्न झाली.

या कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर यांनी भूषविले तर उद्घाटक म्हणून प्रा. अभिजीत शेळके संचालक व्यवस्थापन शास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे होते. उद्घाटक अभिजीत शेळके यांनी संशोधनाचा विषय कसा निवडावा तसेच संशोधनाचे विषय हे कालसुसंगत व उपयोगी निवडून संशोधनाचा फायदा समाजाच्या विविध क्षेत्रात करावा असे आवाहन केले. या उद्घाटन क्षेत्राचे अध्यक्ष डॉ. अशोक तेजनकर सर यांनी विद्यार्थ्यांनी संशोधनामध्ये आपल्या संशोधनाच्या विषयासंदर्भात सखोल अभ्यास करावा आणि नवीन काहीतरी संबंधित विषयात योगदान द्यावे जेणेकरून आपल्या संशोधनाचा उपयोग समाज विकासासाठी होईल, विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील उपलब्ध साहित्य, ग्रंथालय, प्रयोगशाळा यांचा वापर करावा असे देखील ते म्हणाले. या कार्यशाळेच्या आयोजना पाठीमागची



भूमिका कार्यशाळेचे संयोजक डॉ. दिलीप खैरनार यांनी प्रास्ताविकात मांडली याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रवी पाटील, डॉ. अपर्णा तावरे मॅडम, डॉ. गणेश मोहिते, कार्यशाळेचे सहसंयोजक डॉ. ज्ञानेश्वर जिगे, डॉ. परशुराम बाचेवाड, डॉ. प्रदीप गिरे, डॉ. विवेक महाले हे उपस्थित होते.

या कार्यशाळेत सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धतीवर एकूण पाच सत्र घेण्यात आली. पहिले सत्र प्रा. अभिजीत शेळके सर यांनी संशोधन विषयाची निवड यावर घेतले. दुसऱ्या सत्रात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर यांनी उपयोगी व परिणामकारक संशोधन यावर संशोधकांना मार्गदर्शन करून संशोधकांनी जास्तीत जास्त समाज उपयोगी संशोधनाकडे वळून देशाला भक्कम करावे, असे त्यांनी आवाहन केले. तिसऱ्या सत्रात डॉ. दिलीप खैरनार सर यांनी संशोधन उद्दिष्टांची निवड तथा संशोधन साहित्य व नमुना निवड यावर अभ्यासपूर्ण मांडणी संशोधकासमोर केली. चौथ्या सत्रात डॉ. सुरेंद्र ठाकूर सर यांनी प्रश्नावली निर्मिती यावर अभ्यासपूर्ण असे विवेचन संशोधकासमोर मांडले. शेवटी पाचव्या सत्रात डॉ. भागबत बरीक यांनी संशोधन प्रक्रिया व समस्या निवड यावर अभ्यासपूर्ण असे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये एकूण २५० संशोधक, शिक्षक व विद्यार्थ्यांनी पूर्ण वेळ सहभाग घेतला. विशेष म्हणजे महाविद्यालयाने ५९ रुपये या नाममात्र नोंदणी शुल्क ठेवून विद्यार्थ्यांना संशोधन कार्यशाळेत सहभागी होण्याची संधी देऊन उत्कृष्ट अशा सुविधा दिल्या. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी डॉ. अंकुश मोताळे प्रा. सुरज गायकवाड डॉ. शुभांगी मोहोड, श्री काकासाहेब गरुड, श्री अविनाश साळवे, श्री पुष्पराज साबळे, श्री शंकर काशीद, व अमोल लाखकर आदींनी परिश्रम घेतले.

## जागतिक ग्राहक दिन कार्यक्रम; प्रत्येक दिवशी ग्राहकाने सजग राहणे गरजेचे - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आपण प्रत्येक जण दररोज, प्रत्येक क्षणी ग्राहक असतो. अशावेळी ग्राहक म्हणून आपली फसवणूक टाळण्यासाठी प्रत्येक दिवशी ग्राहकाने सजग राहणे आवश्यक आहे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

जागतिक ग्राहक दिन (दि.१५ मार्च) निमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हे होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्ष श्रीमती शिल्पा डोल्हारकर, अपर जिल्हाधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, सहा. आयुक्त अन्न व औषध प्रशासन अनित मैत्रे, मोटार वाहन निरीक्षक संगिता पवार, उपजिल्हाधिकारी श्रीमती संगिता राठोड, सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी संदीप शिंदे, अन्न धान्य वितरण अधिकारी श्रीमती भारती वाकोडे आदी तसेच ग्राहक परिषदेचे अशासकीय सदस्य उपस्थित होते.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रवीण फुलारी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सायबर पोलीस दलाचे गणेश घोरपडे यांनी यावेळी सायबर गुन्हेगारी व त्याद्वारे होणारे फसवणूकीचे प्रकार या विषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, आपण खरेदी करीत असलेली वस्तू, तिची गुणवत्ता, उपयुक्तता, विक्री पश्चात सेवा इ. बाबत तपास्णी कशी करावी याविषयी ग्राहकांनी एकमेकांना मार्गदर्शन करावे. यातुनच ग्राहक चळवळ बलवान होईल.

त्यानंतर शिल्पा डोल्हारकर यांनी ग्राहक हक्क कायद्याविषयी माहिती देऊन उपस्थितांचे प्रबोधन केले.

## जागतिक वन दिन; सायकल रॅली,चित्रप्रदर्शनाद्वारे जनजागृती





**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जागतिक वन दिन सामाजिक वनीकरण विभाग आणि प्रादेशिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला. यानिमित्त सायकल रॅली, चित्रप्रदर्शन , व्याख्यनांचे आयोजन करुन जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमास उपवनसंरक्षक (प्रादेशिक) श्रीमती सुवर्णा माने, मानद वन्यजीव रक्षक डॉ.किशोर पाठक, विभागीय वन अधिकारी (नियोजन) श्रीमती कल्पना टेमगिरे, विभागीय वन अधिकारी (मूल्यांकन) श्रीमती अश्विनी खोपडे, सहायक वनसंरक्षक श्रीमती आशा चव्हाणक सामाजिक वनीकरण विभागाच्या विभागीय वन अधिकारी श्रीमती किर्ती जमदाडे-कोकाटे, सहायक वनसंरक्षक श्रीमती सोनिया शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी (सिल्लोड) एस.बी.तांबे, वनीकरण परिक्षेत्र अधिकारी (पैठण) जी.एस.सातपुते, वनीकरण परिक्षेत्र अधिकारी (शहर) अनिल पाटील, वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) सागर कुटे, तसेच संबंधित वनपाल, वनरक्षक इ. उपस्थित होते.

यानिमित्त सकाळी सात वा. वनसंरक्षक (प्रादेशिक) वनवृत्त, कार्यालयाच्या आवारापासून सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. जिल्हा सायकल संघटनेच्या वतीने ५० सायकल स्वारांनी त्यात सहभाग घेतला.

महात्मा फुले विद्यालय पद्मपूरा या शाळेतील ५० विद्यार्थी तसेच जनसहयोग, निसर्ग मित्र मंडळ या संस्थेचे भासद कार्यक्रमास उपस्थित होते.

या कार्यक्रमात विविधप्रकारचे पथनाट्य व मानवी साखळी तयार करुन वनांचे महत्त्व सांगण्यात आले.

तसेच सामाजिक वनीकरण विभाग यांच्या वतीने कार्यालयाच्या अवारात वन्यप्राणी, पक्षी विषयक निवडक चित्रांचे प्रदर्शन, उपक्रमात सहभागी प्रमाणपत्रांचे वाटप तसेच जनजागृतीपर कार्यशाळा इत्यादी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## अल्पवयीन मुलगा बेपत्ता

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जवाहर नगर येथील रहिवासी असलेला एक अल्पवयीन मुलगा बेपत्ता झाला असल्याची तक्रार प्रभाकर चांदोजी जाधव यांनी जवाहर नगर पोलीस स्टेशन येथे नोंदविली आहे. फिर्यादीनुसार त्यांचा मुलगा प्रशिक प्रभाकर जाधव (वय १७ वर्षे) हा बेपत्ता झाला आहे. दि.१८ रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारापासून तो चेतक घोडा अग्निहोत्री चौक येथून गायब झाला आहे. त्याचा शोध घेण्यात आला असता तो मिळून आला नाही. प्रशिक याचे वर्णन खालील प्रमाणे - रंग सावळा, गालावर मस, केस - काळे वाढलेले, अंगात -ब्लु कलरचे टि शर्ट, व नेव्ही ब्लू कलरची नाईट पँन्ट, मराठी, हिंदी भाषा बोलता व लिहिता येते.


वरील वर्णनाचा मुलगा आढळल्यास त्वरीत जवाहर पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा असे आवाहन करणात आले आहे.



## भद्रा मारोती मंदिर परिसरात एक महिन्याची मुलगी आढळली

**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

येथील भद्रा मारोती मंदिराच्या पायरीजवळ नवजात एक महिन्याची मुलगी आढळली असुन, सदरील मुलगी शुक्रवारी सायंकाळी सात वाजेच्या दरम्यान आढळली.या बाबत भद्रा मारोती येथील कर्मचाऱ्यांनी खुलताबाद पोलीस ठाण्यात माहिती दिली, सदरील नवजात मुलगी खुलताबाद पोलीसांनी ताब्यात घेत तिला औरंगाबाद येथील शिशु विकास केंद्रात पाठविण्याबाबतची कारवाई सुरु होती. परिसरात या घटना संदर्भात उलट सुलट चर्चा करताना नागरिक दिसत होते



## कला महाविद्यालय बिडकीन येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

एकता शिक्षण प्रसारक मंडळाचे कला महाविद्यालय बिडकीन ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथे महाविद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण समारंभ दिनांक १९ मार्च २०२५ रोजी सांस्कृतिक विभागाच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सचिन शिंदे पाटील समन्वयक परम स्किल सेंटर छत्रपती संभाजीनगर व प्रमुख उपस्थिती डॉ. युसुफ पठाण कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन आहेर यांनी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली . कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. मिलिंद ठोकळे यांनी केले त्यांनी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठीचे विविध कार्यक्रम , राबवलेल्या कल्याणकारी योजना व महाविद्यालयाने विद्यापीठ अंतर्गत व आंतर विद्यापीठ अंतर्गत केलेल्या कामगिरीची माहिती दिली . तसेच प्राध्यापकांनी त्यांच्या कर्तुत्वाने त्यांना मिळालेले पुरस्कार यातूनच विद्यार्थ्यांनी प्रेरणा मिळते असे प्रतिपादन केले. यानंतर प्रमुख पाहुणे सचिन शिंदे पाटील यांनी महाविद्यालयातील स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यातील संधी आहे. महाविद्यालयात विद्यार्थी आपल्या करिअरची सुरुवात करतात महाविद्यालयांमधून कवी ,लेखक ,दिग्दर्शक ,निर्माता, पत्रकार , हिरो ,हिरॉईन, नाटकार, कलाकार, त्याचबरोबर चांगले खेळाडू घडवण्याचे हे एकमेव केंद्र म्हणजे महाविद्यालय असते असे सांगितले कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. नितीन आहेर यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केलेल्या कामगिरीबद्दल आनंद व्यक्त करून विद्यार्थ्यांचे यश म्हणजे प्राध्यापकांनी केलेल्या कामाची पोचपावती आहे व विद्यार्थ्यांच्या यशातूनच महाविद्यालयाचे नाव मोठे होते म्हणून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयमधे शिकत असताना आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी कोणत्याही प्रकारचा मनामध्ये न्यूनगंड न बाळगता आपल्या सप्तगुणांना वाव दिला पाहिजे असे मनोगत व्यक्त केले .यानंतर महाविद्यालयामध्ये विविध गुणदर्शन कार्यक्रम, कवी संमेलन , प्रश्नमंजुषा , शेलापागोटे , एकांकिका, भारुड, गोंधळ अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते . या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला .




यानंतर बक्षीस वितरण समारंभ घेण्यात आला यामध्ये महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागातून प्रथम ,द्वितीय ,तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला . डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर अंतर्गत जानेवारी २०२५ मधे सालाबादप्रमाणे युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते या युवा महोत्सवांमध्ये कला महाविद्यालय बिडकीन या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रश्नमंजुषा या स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवल्याबद्दल त्यांना सन्मानचिन्ह आणि विद्यापीठाने दिलेले प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले . यामध्ये गणेश नाईक ,आदेश गायकवाड ,योगेश शिंदे ,आणि स्वाती शिरवत या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभाग प्रमुख व संघप्रमुख प्रा. मिलिंद ठोकळे , महिला संघप्रमुख डॉ. अर्चना काटकर डॉ. शेख मुखत्यार, डॉ. वैशाली पेरके यांचे मार्गदर्शन लाभले.

सूत्रसंचालन हिंदी विभाग प्रमुख डॉ . शेख मुखत्यार यांनी अतिशय अभ्यासपूर्ण आणि शेर शायरीने मुलांना खेळवत ठेवले आणि संपूर्ण वातावरण आनंदीमय झाले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. मोहसीन शेख ,डॉ. रमेश गायकवाड ,डॉ. मुजीब सय्यद, डॉ. प्रसाद करंदीकर, डॉ. रामकिसन मुंडे सर प्रशासकीय कर्मचारी नरहरी उबाळे, संभाजीराव आंधळे, अण्णासाहेब थिटे, शेख कयूम त्यांनी अतिशय मेहनत घेतली या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ग्रंथपाल डॉ. अंजली काळे यांनी केले आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

## देवगिरी महाविद्यालयात कै. पं. नाथराव नेरळकर स्मृती राज्यस्तरीय शास्त्रीय गायन स्पर्धेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दि. २१ मार्च २०२५ म. शि. प्र. मंडळ संचलित देवगिरी महाविद्यालय संगीत विभाग आयोजित कै. पं. नाथराव नेरळकर स्मृती हिंदुस्थानी शास्त्रीय गायन स्पर्धेचे आयोजन रविवार दि. २३ मार्च २०२५ रोजी सकाळी १०:०० वा. देवगिरी महाविद्यालयातील रवींद्रनाथ टागोर सभागृह येथे करण्यात आले आहे. भारतीय संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्राप्त पं. नाथराव नेरळकर हे प्रख्यात शास्त्रीय गायक आणि संगीततज्ज्ञ होते. संगीत क्षेत्रातील त्यांचे योगदान प्रशंसनीय आहे २०१५ पासून देवगिरी महाविद्यालयाच्या संगीत विभागात ते मानद कलाकार म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. त्यांच्या शास्त्रीय संगीतातील कारकीर्दीचा सन्मान म्हणून देवगिरी महाविद्यालयाने त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ राज्यस्तरीय हिंदुस्थानी शास्त्रीय गायन स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेसाठी अनुक्रमे रुपये २१,०००/-, रुपये १५,०००/-, रुपये ११,०००/- व तसेच स्मृतिचिन्ह प्रथम द्वितीय व तृतीय अशी पारितोषिके दिली जाणार आहेत. सदरील स्पर्धेत वय वर्ष १६ ते २५ या वयोगटातील स्पर्धक सहभागी होणार आहेत. या राज्यस्तरीय हिंदुस्थानी शास्त्रीय गायन स्पर्धेचे उद्घाटन शहरातील प्रथितयश शास्त्रीय गायक पं. विश्वनाथ ओक यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. याप्रसंगी देवगिरी महाविद्यालयाच्या विकास समितीचे ज्येष्ठ सदस्य श्री पंडितराव हर्षे यांची विशेष प्रमुख उपस्थिती असणार आहे.

सदरील राज्यस्तरीय हिंदुस्थानी शास्त्रीय गायन स्पर्धेमध्ये दिनांक २३ मार्च २०२५ रोजी स्पर्धकांनी तसेच शहरातील संगीत रसिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक तेजनकर, उपप्राचार्य डॉ. रवी पाटील, डॉ.अपर्णा तावरे, डॉ.गणेश मोहिते, संगीत विभाग प्रमुख तथा स्पर्धा समन्वयक प्रा.शैलजा कुलकर्णी यांनी केले आहे.

## अरहान आलम शहा खान याचा पहिला रोजा



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

रोशन गेट येथील अरहान आलम शाह खान (९)यांच्या पहिला रोजा ठेवला होता. रोशन गेट येथील आलमशहा खान यांच्या मुलगा अरहान खान यांनी आपल्या जीवनाच्या पहिला रोजा उपास ठेवला होता पवित्र रमजान महिना सुरू झालेला आहे लहान मोठे रोजे उपास ठेवतात यात लहान मुलांचा जास्त समावेश असतो आणि उत्साह पण असतो रमजान म्हटले की इबादतचा पवित्र महिना मानला जात आहे. अरहान आलम शाह खान यांनी आपल्या जीवनाचा पहिला रोजा उपास ठेवल्याने नातेवाईक व मित्र परिवारांनी कौतुक करून शुभेच्छा दिलेले आहे.


हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

**• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

**• Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**